दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक ११० • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.१४ जुलै २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## महागाईचा कहर ; पेट्रोल आणि डिझेल पाठोपाठ

# सीएनजी व घरगुती पाईपलाईन गॅसच्या दरात प्रचंड वाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**एकीकडे पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलिंडरच्या दरांमध्ये विक्रमी वाढ झाल्याने सर्व सामान्य माणूस पोळलेला असताना आता सीएनजी आणि घरगुती पाईपलाईन गॅसच्या दरात मोठी वाढ होणार आहे. हे नवे दर मध्यरात्रीपासून लागू होणार आहेत.**




गॅस पाइप लाईन वाहतुकीच्या खर्चामध्ये वाढ झाल्यामुळे परिचालन खर्च आणि अतिरिक्त खर्चाचे नियोजन करण्यासाठी ही दरवाढ करण्यात येणार असल्याचे महानगर गॅस लिमिटेडने स्पष्ट केले आहे. यानुसार आज मध्यरात्रीपासून कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस मध्ये थेट २.५८ प्रति किलो आणि पीएनजी गॅसच्या किंमतीत ०.५५ रुपये प्रति युनिटने वाढ केली जाणार आहे. हे दर १३ जुलै २०२१ च्या मध्यरात्री, १४ जुलै २०२१ रोजी सकाळी मुंबईत लागू होतील.

या नव्या दरवाढीनुसार मुंबई आणि आसपासच्या सीएनजी, घरगुती पीएनजीच्या सुधारित किंमती या ५१.९८ प्रति किलोग्रॅम आणि ३०.४०/ एससीएम (स्लॅब १) आणि ३६.००/ एससीएम (स्लॅब २) अशा होणार आहेत. अंतरानुसार यामध्ये कमी अधिक फरक असणार आहे. असे असले तरी देखील मुंबईत सध्या पेट्रोल आणि डिझेल दरांच्या तुलनेत सीएनजी अनुक्रमे ६७% आणि ४७% कमी असणार आहे. तसेच घरगुती एलपीजी सिलिंडरच्या तुलनेत पीएनजीचे दर ३५ टक्क्यांनी कमी असणार आहेत.

# घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारांना पनवेल शहर पोलिसांनी केले गजाआड



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर परिसरात घरफोड्या करणाऱ्या तीन सराईत गुन्हेगारांना पनवेल शहर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने गजाआड करून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल हस्तगत केला आहे.

पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील कृष्णा मोबाईल शॉप, हिरा मनिष अपार्टमेंट, पनवेल येथे कोणीतरी अज्ञात चोरटयाने घरफोडी चोरी करुन मोबाईल फोन व इतर मोबाईल साहीत्य चोरी करुन नेल्याची तक्रार करण्यात आली होती. वाढत्या घरफोडी, चोरीचे गुन्ह्यांच्या प्रमाणानुसार पोलीस आयुक्त बीपिन कुमार सिंह, पोलीस सहआयुक्त डॉ.जय जाधव, पोलीस उप आयुक्त शिवराज पाटील व सहा. पोलीस आयुक्त, भागवत सोनवणे यांनी विशेष प्रयत्न करत सदरचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार पनवेल शहर पोलीस ठाणेचे वपोनि अजयकुमार लांडगे व पोनि (गुन्हे) संजय जोशी यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि अनिल देवळे,पोउपनिरी सुनिल तारमळे, पोहवा रविद्र राऊत, पोना परेश म्हात्रे, पोशि सुनिल गर्दनमारे, पोशि युवराज राऊत, पोशि विवेक पारासुर, पोना विनोद पाटील,पोशि यादवराव घुले, पोना पंकज पवार, पोना गणेश चौधरी, पोशि खेडकर व पोशि भगवान साळुंखे आदींच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले होते. एका आरोपीचे हातावर व दुसऱ्या आरोपीचे मानेवर टॅटू असल्याचे दिसत होते.

सदर आरोपी बाबत गोपनिय बातमीदारा मार्फत माहीती काढुन पनवेल शहर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्हयातील आरोपी निलेश अनिल दामोदर, (वय २९ रा.पोदी जुना रेल्वे फाटक झोपडपट्टी, से.१६,नवीन पनवेल), समीर संभाजी धुलप, (वय २८ वर्षे, रा.पंचशिल नगर झोपडपट्टी नवीन पनवेल) व महेश प्रभाकर चवरकर (वय ३० वर्षे, रा.पंचशिल नगर झोपडपट्टी नवीन पनवेल) यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून २,०१,५९० /- रूपये किंमतीचे १६ मोबाईल फोन, १९,१००/- रुपये किंमतीचे ६ हेडफोन, रमार्ट वॉच, वॉच चार्जर,मार्ट चार्जर, पॉवरबॅक, युएसबी वायर, इत्यादी, ५,०००/- रूपये किंमतीची ९ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी व ९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे पान, ३,०००/- रुपये रोख रक्कम, १५०/-रूपये किंमतीची एक लोखंडी कटावणी व एक रकु ड्रायव्हर असा मिळून २,२८,८४०/- ऐवज हस्तगत केला आहे. सदर गुन्हयातील अटक आरोपी हे एकमेकांचे मित्र आहेत. सदर आरोपीत हे रात्रीच्या वेळेस कटावणी व स्क्रु ड्रायव्हरच्या सहाय्याने दुकान व घर फोडुन घरफोडी चोरी करतात. घरफोडी चोरी करुन मिळालेल्या वस्तु नाक्यावरील कामगार लोकांना विकत असतात असे तपासात निष्पन्न झाले आहे.

## संक्षिप्त...

### म्हाडा मुंबईतील पडीक भूखंडावर बांधणार लॉटरीची घरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

जागतिक बँकाच्या प्रकल्पात म्हाडाकडून काही संस्थांना भूखंड देण्यात आले होते. यातील बहुतेक भूखंड हे शासनच्या संस्थाच्या ताब्यात आहेत. मात्र हे भूखंड असेच पडून आहेत. येथे अतिक्रमण होण्यासह इतर अनेक समस्या निर्माण झाल्याच्या तक्रारी येत आहेत. आता याप्रकरणात संबंधित संस्थांना नोटीस देत म्हाडा हे भूखंड आपल्या ताब्यात घेणार आहे. किमान शंभरएक भूखंड असे असून, हे भूखंड बंगलो, घरे बांधण्यासाठी होते. आता हे भूखंड ताब्यात घेण्यात आल्यावर भविष्यात म्हाडाकडून यावर बांधण्यात येणारी घरे लॉटरीसाठी वापरण्यात येणार आहेत.

म्हाडाच्या वांद्रे येथील मुख्यालयात मंगळवारी महापौर किशोरी पेडणेकर, खासदार गजानन किर्तीकर, खासदार अरविंद सांवत, आमदार आणि नगरसेवक यांची संयुक्त बैठक झाली. यावेळी महापालिकेच्या विविध विभागाचे मुख्य अभियंतादेखील उपस्थित होते. या बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून, उर्वरित अनेक नागरी सेवा सुविधांशी संबधित निर्णय घेण्यात आले आहेत, अशी माहिती मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती विनोद घोसाळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

म्हाडा नियोजन प्राधिकरण झाल्यानंतर म्हाडामध्ये आम्ही नागरी सुविधा पुरविणार नाही, अशी भूमिका महापालिकेने यापूर्वी घेतली होती. लोकप्रतिनिधींनी याबाबत प्रश्न मांडला होता. नागरी सुविधा नक्की कोणाची जबाबदारी ? असा प्रस्ताव युडीला गेला. युडीने यावर निर्देश दिले की या सुविधा महापालिकेने द्यायच्या आहेत. मात्र महापालिका आदेश अंमलात आणत नव्हती. परिणामी नागरी सेवा सुविधांचा खोळंबा होत होता. मात्र आता पाणी, रस्ते आणि जलवाहिन्यांचा खर्च महापालिका करणार आहे, असा निर्णय बैठकीत घेण्यात आला. तीस वर्षांपूर्वी जेथे कॉलनी झाल्या तेथे नागरी सुविधा म्हाडाकडे हस्तांतरित झाल्या.

# महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली इंधनवाढीविरोधात उरणमध्ये काँग्रेसची निदर्शने

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

केंद्रातील मोदी सरकारने केलेल्या पेट्रोल - डिझेल व गॅस दरवाढ विरोधात काँग्रेसचे नेते महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली आज दिनांक १४ जुलै रोजी उरण शहरात सायकल रॅली काढून उरण येथील पेट्रोल पँपावर काँग्रेस पार्टीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी निदर्शने करून मोदी सरकारचा निषेध व्यक्त केला आहे.

केंद्रातील सरकार दर दिवसाला पेट्रोल डीझल गॅस वाढ करीत आहे. या दरवाढी मुळे महागाई गगनाला भिडली आहे.खाद्य तेलाच्या किमतीही वाढल्याने सर्व सामान्य जनतेला कोरोनाच्या पार्श्र्वभूमीवर अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.गँस सिलिंडर वर होणारी दरवाढीमुळे घरातील गृहिणींनाही याचा त्रास सहन करावा लागत असल्याचे महिला अध्यक्षा सौ. रेखा घरत यांनी याप्रसंगी नमूद केले आहे.



मोदी सरकार सतत पेट्रोल डिझेल व गॅस सिलेंडर यांच्या किंमतीत वाढ करत असल्याने उरण तालुका काँग्रेस पक्षातर्फे काढण्यात आलेल्या निश्चित सायकलवरील रँलीत प्रसंगी काँग्रेस पक्षाचे नेते महेंद्र घरत यांनी बोलतांना सांगितले की या इंधन दर वाढीचा फटका सर्वसामान्य जनतेला बसत आहे. ज्या वेळी काँग्रेस च्या काळात गॅस दोनशे ते अडीचशे होते तेव्हा भाजपा च्या नेत्यांनी रान पेटविले होते. त्यावेळी भाजपचे सरकार आले तर पेट्रोल डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसचे दर कमी करण्यात येतील असे आश्वासने दिले. तसेच प्रत्येकाच्या खात्यामध्ये पंधरा पंधरा लाख रुपये टाकण्याचेही आश्वासने देऊन भाजपा सत्तेत आली परंतु सत्तेत आल्यानंतर फक्त आदाणी आणि अंबानी या उद्योजकानाच मोठे करण्याचे काम केले. आणि सर्व सामान्य जनतेला महागाईच्या वणव्यात होरपळत ठेवण्याचे काम हाती घेतले आहे. याला सर्वस्वी जबाबदार हे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत त्यामुळे त्यांनी आपल्या पदाचा राजनामा दिला पाहिजे अशी स्पष्ट भूमिका महेंद्र घरत यांनी आपल्या भाषणात मांडून मांडून केंद्रसरकारचा निषेध केला.

यावेळ काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, काँग्रेस जिल्हा सरचिटणीस महेंद्र ठाकूर, इंटकचे जिल्हा अध्यक्ष किरीट पाटील, काँग्रेस ओबीसी सेल प्रदेश सरचिटणीस उमेश भोईर, महिला तालुका अध्यक्षा रेखा घरत, जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी, उरण विधान सभा प्रभारी आखालाक शिलोत्री, शहर अध्यक्ष अफशा मुकरी, वंदना घरत, उरण विधान सभा युवक अध्यक्ष रोहित घरत, मार्तंड नाखवा, श्रेयस घरत, राजेंद्र भगत, किरण कुंभार, विनोद पाटील, रवी भगत, प्रकाश पाटील, अब्दुल शिलोत्री, रामनाथ पाटील, आदी सह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# सिडकोकडून प्रस्तावित मराठी भाषा भवन उपकेंद्राच्या उभारणीकरिता ऐरोली येथील भूखंडाचे राज्य शासनाकडे हस्तांतरण



**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळाकडून मराठी भाषा भवन उपकेंद्राच्या उभारणीकरिता महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाला देण्यात आलेल्या, नवी मुंबईतील ऐरोली येथील भूखंडाचे १३ जुलै २०२१ रोजी सुभाष देसाई, मंत्री, मराठी भाषा विभाग यांच्या उपस्थितीत व सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली सिडकोच्या अधिकाऱ्यांतर्फे हस्तांतरण करण्यात आले. या वेळी सुभाष देसाई यांनी सदर भूखंडाची पाहणी केली.

या प्रसंगी श्री. मिलिंद गवादे, सहसचिव, मराठी भाषा विभाग, एस. एस. पाटील, सहव्यवस्थापकीय संचालक सिडको, अनिल पवार, अपर जिल्हाधिकारी तथा महाव्यवस्थापक (वसाहत) सिडको, श्रीमती. प्रिया रातांबे, जनसंपर्क अधिकारी, सिडको, बी. डी. राठोड, सहाय्यक भूमापन अधिकारी, सिडको तथा सिडकोचे अन्य अधिकारी उपस्थित होते.

मराठी भाषा भवन उपकेंद्राची इमारत ही बहुउद्देशीय सामाईक सुविधांनी युक्त असणार आहे. या इमारतीत ग्रंथालय, बैठकांसाठी बहुउद्देशीय सभागृह यांसह .../२

# म्हसळ्यात पावसाचा हाहाकार ; नद्या नाल्यांना पूर, जनजीवन विस्कळीत

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

जिल्ह्यात दिवसभरात सरासरी ८० मि.मी. पावसाची झाली नोंद झाली तर म्हसळया ला दिवसभरात २१० मि.मी. पाऊस बरसला. आजपर्यंत म्हसळ्यात एकूण खामगाव सर्कल मध्ये ११. ज० मि.मी. तर म्हसळा सर्कल मध्ये ७८ मी. मी.आणि खामगाव सर्कल मध्ये एकूण पाऊस ११९ मी. मी. तर म्हसळा सर्कल मध्ये एकूण २७१ मी. मी.पावसाची नोंद झाली आसल्याचे तहसीलदार शरद गोसावी यानी सांगितले. आत्तापर्यंत सरासरी वार्षिक पर्जन्यमानाचे ४२% पाऊस तालुक्यात झाला आहे. आवण(रोपे) लावणीसाठी तयार असतानाआकाशाकडे डोळे लावून



बसलेल्या बळीराजाला मोठा दिलासा मिळाला आहे. आजही दिवसभर पावसाचे प्रमाण कालच्या प्रमाणेच होते. शहरालगत ची असणारी जानसई नदी सुध्दा दुथडी भरून वहात आहे.

म्हसळा शहरांतील दिघी रोड, झेड कॉम्लेक्स, जुने पोस्ट .../२

# सायकल चोरीसह मंगळसूत्र चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात गर्दीच्या ठिकाणी महिलांचे मंगळसूत्र व इतर सोन्याचे दागिने तसेच सायकली चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारांस पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

शहरातील रायगड बाजार, पनवेल येथे कोणीतरी अज्ञात चोरटयाने एका महिलेच्या पर्स मधून सोन्याचे मंगळसुत्र चोरी करुन नेल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. त्याचप्रमाणे गेल्या काही दिवसामध्ये सायकल चोरीचे प्रमाण सुद्धा वाढले होते. त्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाणेचे वपोनि अजयकुमार लांडगे व पोनि (गुन्हे) संजय जोशी यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि अनिल देवळे,पोउपनिरी सुनिल तारमळे, पोहवा रविद्र



राऊत, पोना परेश म्हात्रे, पोशि सुनिल गर्दनमारे, पोशि युवराज राऊत, पोशि विवेक पारासुर, पोना विनोद पाटील,पोशि यादवराव घुले, पोना पंकज पवार, पोना गणेश चौधरी, पोशि खेडकर व पोशि भगवान साळुंखे आदींच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले होते व गुप्त बातमीदाराच्या माहितीनुसार दिनेश रामदास जाधव, (३५ वर्षे पनवेल) .../२

# उरणच्या रस्त्यांना आला नवा थाट ; आदिवासींच्या नशिबी मात्र चिखलाची वाट

**दै.रायगड नगरी । उरण**

करोडो रुपये खर्च करून उरण तालुक्यातील रस्ते चकाचक करण्यात आले असून त्यांना नवा थाट लाभला आहे. मात्र चिरनेर गावापासून अवघ्या तीन किमी अंतरावर डोंगर कुशीत वास्तव्य करणाऱ्या केल्याचा माळ आदिवासी वाडीवरील कातकरी आदिवासींना चिखलाची वाट तुडवीत आपले घर गाठावे लागत आहे.विशेष म्हणजे या रस्त्यासाठी रायगड जिल्हा परिषदेतून दोन वर्षांपूर्वीच सुमारे १७ लाखांचा निधी मंजूर होऊनही कमिशनच्या वादात या निधीतील एक रुपया सुद्धा या रस्त्यावर खर्च न केल्याने या आदिवासींना हे भोग भोगावे लागत असल्याने आदिवासी समाजात संताप व्यक्त होत आहे.




प्रत्येक वाडी वस्तीवर रस्ता हे शासनाचे धोरण असतानाही चिरनेरच्या आदिवासींना अजूनही रस्त्याविना रहावे लागले आहे. चिरनेर ग्रामपंचायत हद्दीत पाच आदिवासी वाड्या असून .../२

# पूर्वी गंजलेले विजेचे खांब उभे होते आता नवीन खांबपण होताहेत आडवे

## महावितरणच्या ठेकेदारावर कृपादृष्टी कोणाची?





**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये ठिकठिकाणी जुने विजेचे खांब बदलून नवीन उभारण्याचे काम ठेकेदारामार्फत महावितरणकडून करून घेण्यात येत असून ठेकेदारावर कोण्या सराईत अभियंत्याची कृपादृष्टी असल्याने सिमेंटऐवजी दगडी भुकटीचा वापर सर्रास करून उभे केलेले नवीन विजेचे खांब त्यावरून विद्युतवाहक तारा ओढण्यापूर्वीच आडवे होत असल्याचे दृश्य माटवण येथे पाहण्यास मिळाले. माटवण येथे सोमवारी सायंकाळी रस्त्यावर कोसळलेल्या या विजेच्या खांबामुळे परिसरातील नागरिकांमध्ये नवीन खांबांच्या उभारणीबद्दल साशंकता निर्माण झाली असून जनभावनाही संतप्त झाल्या आहेत.

पोलादपूर तालुक्यात मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगत तसेच ग्रामीण भागात नवीन विजेचे खांब उभारण्याकामी ठेकेदारांकडून कामे सुरू आहेत. महामार्गालगतच्या नवीन खांबांच्या उभारणीचे काम सुरू असताना जुने खांब कापून ते परस्पर भंगारात विकण्याचा प्रकार एका व्हायरल व्हिडीओमुळे उघडकीस आल्यानंतर उपकार्यकारी अभियंता सुद यांनी एसटी इलेक्ट्रिकल्स प्रा.लि. या कंपनीचा कामगार सदरचे कृत्य करीत असल्याने सदर कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर गोपाळ अहिरराव यांना पत्र लिहून समज दिली होती तर या घटनेबाबत फिर्याद देणारे महावितरणचे अभियंता ज्ञानेश्वर माने यांना मात्र सदर व्यक्ती अज्ञात असल्याचा साक्षात्कार झाला होता. यानंतरही पोलादपूर तालुक्यात असे प्रकार सर्रास घडून येत असल्याची चर्चा वेळोवेळी होत असून या सर्व प्रकारात येथे अनेक वर्षे नोकरी करून कंटाळलेल्या अभियंत्याचेच अभय असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

याच प्रकाराचा दुसरा भाग म्हणून तालुक्यातील अनेक गंजलेले विजेचे खांब बदलून नवीन खांब बसविण्याचे काम सुरू असताना जमिनीमध्ये योग्य आकाराचा खड्डा खणून खांब उभा केल्यानंतर त्यामध्ये खांब उभा राहण्यासाठी सिमेंट काँक्रीटचा वापर करण्याऐवजी ग्रीटचा अधिकाधिक वापर करून सिमेंटचा खर्च कमी करण्याचा प्रकार झाला आहे. यामुळे सप्तक्रोशी भागातील माटवण येथे विजेचा नवीन खांब अशाच प्रकारे बसविल्यानंतर सोमवारी सायंकाळी सदर खांब भोराव माटवण ते सवाद रस्त्यावर कोसळला. यामुळे सप्तक्रोशीतील ग्रामस्थ भयभित झाले असून या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची चर्चा होऊ लागली आहे. पोलादपूर तालुक्यातील सर्वपक्षियांना आरोग्यसुविधा, विद्युतपुरवठा, पाणीपुरवठा आदी विषयांबाबत संवेदनशीलता असूनही कोण्या अभियंत्यांच्याच कृपेने पोलादपूर तालुक्यात महावितरणचा खेळखंडोबा सुरू असल्याची चर्चा असून ज्या अभियंत्यांना पोलादपूर तालुक्यात नियमापेक्षा जास्त काळ सेवा करण्याचा कंटाळा आला आहे. त्यांनी जनतेच्या भावनांसोबत खेळून स्वत:च्या बदलीसाठी परिस्थिती निर्माण करीत उखळ पांढरे करून घेण्याचा प्रकार अवलंबिला असल्याची चर्चा होत आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल नामे १) श्री.मनसुख लीरा वेरात, २) श्री.धरमशी नारन नोर, ३) श्री.दिनेश नरशिंग आरेठिया, पत्ता : रा.सदनिका क्र.३०१, श्रीजी व्हीला, प्लॉट नं.२०९, सरसोळे, मेरेडियन, टॉवर जवळ, सेक्टर ६, नेरुळ, नवी मुंबई ४००७०६, यांनी खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकतीबाबत १) श्री.देवेंद्र उर्फ दिलीप प्रभाकर सावंत, २) श्रीमती.सुनिता सुनील साळवी, ३) श्रीमती.मंगला विठ्ठल सावंत, रा.पत्ता : सदनिका क्र.१ बी, तळ मजला, हर्जिवनदास एस्टेट, डॉ. आंबेडकर रोड, ए टु झेड शॉपिंग सेंटर, दादर पूर्व मुंबई यांचे बरोबर दिनांक ०९/०७/२०२१ रोजी साठेखत / बयाणा पावती तथा परस्पर सामंजस्य करारनामा केलेला आहे.

तरी सदर मिळकती संबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, वारस हितसंबंध, गहाण, ताबा, दान, बक्षिस, पोटगी, विक्री, विश्वस्त, कुळ, वहिवाट, अॅटेचमेंट इ. अगर अन्य कोणत्याही स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचे कार्यालयात खालील प्रमाणे दिलेल्या पत्यावर समक्ष येवून भेटावे जर अशी लेखी खबर अथवा हरकत सदर मुदतीत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार अथवा हितसंबंध नाही अगर तसा असल्यास त्याने सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील हे सर्वांस कळावे व त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व त्यास आमचे अशिल जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : देहरंग, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | गट क्रं./सर्वे क्रं. | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| गाव देहरंग ता.पनवेल | १/य/१२ | ४०-५०-०० हे.आर. ४०५.०० आकार एकूण ४०-५०-२० हे.आर. |

दिनांक : १३/०७/२०२१
नवी मुंबई

सही/-
अॅड.देवेंद्र भिका पाटील
शॉप नं.१, श्रीजी सोहम, सी.एच. एस.लि., भूखंड क्रं.७६, सेक्टर २१, उलवे, नवी मुंबई ४१०२०६



मा.गोडसे मॅडम
अॅड.स्वप्नील उपाध्ये, अॅड.केदार देशपांडे पनवेल
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.७३०/२०२१
नि.नं.१५/ड
ने.ता.१७/०८/२१

श्री.चिन्मय दत्तात्रय निमकर आणि २ इतर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं.२ यांचे पती व अर्जदार क्र.१ आणि ३ यांचे वडील कै.दत्तात्रय वसंत निमकर यांचे मु.पो.दहिवली तर्फे नीड, तालुका : कर्जत, जिल्हा : रायगड येथे दिनांक १०/०५/२०१० रोजी निधन झाले आहे. श्री.चिन्मय दत्तात्रय निमकर आणि २ वगैरे ह्यांनी कै.दत्तात्रय वसंत निमकर यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**अ) मौजे : दहिवली तर्फे नीड, ता.कर्जत, जि.रायगड येथील सी.टी. एस. क्र.३३ आणि ३४ या जमीनीवर बांधण्यात आलेल्या मथुरा अपार्टमेंट या इमारतीचे दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रं.१२, क्षेत्र ३४.९३ चौ.मीटर कार्पेट म्हणजेच ३७६ चौ.फूट या वर्णनाची निवासी सदनिका आणि त्यासोबतचे सर्व तदंगभूत हक्क व अधिकारांसोबत दरोबस्त**

श्री चिन्मय दत्तात्रय निमकर, श्रीमती.अलका दत्तात्रय निमकर, कु. तन्मयी दत्तात्रय निमकर यांनी कै.दत्तात्रय वसंत निमकर यांचे कायदेशीर वारस आहेत असे वारसपत्र मिळणेकामी या मे.कोर्टाकडे एक अर्ज केलेला आहे. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.चिन्मय दत्तात्रय निमकर, श्रीमती.अलका दत्तात्रय निमकर, कु.तन्मयी दत्तात्रय निमकर यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.दत्तात्रय वसंत निमकर यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१३/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


पृष्ठ क्र.१ वरुन...

## ऐरोली येथील भूखंडाचे राज्य शासनाकडे हस्तांतरण

भाषाविषयक विविध उपक्रमांची कार्यालये व अध्यक्षांसाठी स्वतंत्र दालनांची व्यवस्था असणार आहे, अशी माहिती मा. श्री. सुभाष देसाई, मंत्री, मराठी भाषा विभाग यांनी या प्रसंगी दिली.

मराठी भाषा विकास व संवर्धनाकरिता कार्यरत असणाऱ्या भाषा संचलनालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्था, या संस्थांची कार्यालये मुंबईमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. यामुळे ही सर्व कार्यालये एकाच ठिकाणी आणून त्यामध्ये एकसूत्रता निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने २०१६ मध्ये सिडकोकडे भूखंडाबाबत विचारणा केली होती. त्यानुसार, सिडकोकडून ऐरोली येथील सेक्टर-१३ मधील भूखंड क्र. ६अ हा अंदाजे ३००० चौ.मी. चा भूखंड मराठी भाषा भवन उपकेंद्राकरिता निश्चित करण्यात येऊन, दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने या भूखंडाचा ताबा राज्य शासनाला देण्यात आला. त्याचप्रमाणे इमारतीची उभारणी करण्याची जबाबदारी शासनातर्फे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास देण्यात आली आहे अशी माहिती मा. श्री. सुभाष देसाई, मंत्री, मराठी भाषा विभाग यांनी दिली.

## म्हसळ्यात पावसाचा हाहाकार ; नद्या नाल्यांना पूर, जनजीवन विस्कळीत

ऑफीस एरीया (खालचे नवा नगर) या भागांत गटाराचे पाणी नागरी वस्तीत शिरले आणि दाणादाण उडवली. दिघी पुणे राष्ट्रीय मार्गावरील म्हसळा शहराला पर्यायी रस्त्यावरील (बायपास ) अनेक भागात रस्त्यालगतचे धस कोसळ्याने रस्त्यावर असीम काजी, इम्रान काजी व मित्रानी अडथळे निर्माण करून माणगाव, पुणे, मुंबई, महाडकडे जाणारी व येणारी प्रवासी वहाने प्रसंगावधान रोखून फिरवली त्या बद्दल त्यांचे कौतुक होत आहे. पावसाचे विश्रांतीनंतर पुलावरून पाणी जात असल्याने प्रसंगावधान म्हणून वाहतुकीला बंद असलेले म्हसळा-ढोरजे- देवधर- कुडतोडी आणि आंबेत-बांगमांडला - हरेश्वर रस्ता सायं ७ नंतर सुरू झाल्याचे म्हसळा अपत्ती व्यवस्थापन कक्षातून सांगण्यात आले.

## सायकल चोरीसह मंगळसूत्र चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास अटक

यास येथुन ताब्यात घेवुन त्याची चौकशी केली असता त्याने सोन्याचे मंगळसुत्रासह १३ चोरीच्या सायकली असा मिळून एकूण १ लाख ५ हजार रुपये किंमतीचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. याच्या अटकेमुळे अनेक गुन्हे उघडकीस आले आहेत.

## उरणच्या रस्त्यांना आला नवा थाट ; आदिवासींच्या नशिबी मात्र चिखलाची वाट

त्यापैकी केल्याचा माळ या आदिवासीवाडीवर अजूनही पक्का रस्ता नाही. चिरनेर गावातून ते आदीवासी पायवाटेने त्यांच्या तीन किमी दूर डोंगरात असलेल्या वाडीवर मार्गस्थ होतात. त्याचबरोबर रानसईचे आदिवासी बांधवही याच रस्त्यातून आपल्या डोंगरातील गावात जातात. या आदिवासी वाडीपर्यंत रस्ता व्हावा म्हणून चिरनेर गावातील शेतकऱ्यांनी दातृ भावनेतून आपल्या शेतजमिनीतील काही जागा रस्त्यासाठी दिल्याने गावातील पी पी खारपाटील व राजेंद्र खारपाटील यांनी या आदिवासींसाठी कच्चा रस्ता बनविला. हा रस्ता पक्का करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या निधीतून या रस्त्यासाठी सुमारे १७ लाखांचा निधी जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी यांनी मंजूर करूनही घेतला. हा निधी मंजूर होऊनही काम कोणी करावे व त्याचे कमिशन कसे घ्यावे या वादात हा रस्ता अडकला आहे.आदिवासींना पक्का डांबरी रस्ता देण्याऐवजी चिरनेर ग्रामपंचायत या रस्त्याच्या कामाबाबत गेली दोन वर्षे उदासीनता दाखवत असून आदिवासींच्या समस्येकडे दुर्लक्ष करीत आहे.त्यामुळे भर पावसात या आदिवासींना गुडगाभर चिखलातून वाट शोधत आपले घर गाठावे लागत आहे. उरणचे रस्ते चकाचक आणि आदिवासी वाडीवरील रस्ता चिखलमय हा दुराभास दिसत असल्याने चिरनेर ग्रामपंचायतीचा नाकर्तेपणा यातून दिसून येत आहे.पक्का रस्ता द्याल तेव्हा द्याल किमान या कच्च्या रस्त्यावरील चिखलाच्या वाटेवर दगडमातीचा भराव केला तरी चालणे शक्य होईल व आदिवासी समाजावर उपकार होतील अशी संतप्त प्रतिक्रिया आदिवासी समाजातून व्यक्त होत आहे.

# काळसेकर पॉलिटेक्निकद्वारे करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे नि:शुल्क आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अंजुमन- ए- इस्लाम या प्रसिद्ध शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या पनवेल येथील एन. बी.ए. मानांकित अब्दुल रझाक काळसेकर पॉलिटेक्निक द्वारे दिनांक १८.७.२०२१ रोजी नि:शुल्क करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

अनेकविध नावीन्यपूर्ण विद्यार्थी केंद्रित उपक्रम राबविणारे अब्दुल रझाक काळसेकर पॉलिटेक्निक दरवर्षी १०, १२ वी तसेच आय. टी.आय. उत्तीर्ण विद्यार्थी साठी करिअर निवडीबाबत मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करीत असते. याही वर्षी दिनांक १८.७.२०२१, रविवार रोजी , दुपारी २.३० वाजता ऑनलाईन माध्यमातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून १०, १२ वी तसेच आय. टी.आय. उत्तीर्ण विद्यार्थी या करिअर मार्गदर्शनपर कार्यक्रमातून ज्येष्ठ, अनुभवी आणि तज्ञ मार्गदर्शकांसमवेत संवाद साधत आपल्या करिअरबाबतच्या शंकांचे निरसन देखील करून घेऊ शकतात. विद्यार्थी,पालक, शालेय शिक्षक आणि मुख्याध्यापक तसेच कनिष्ठ महाविद्यालयांचे अध्यापक आणि प्राचार्य आदी या कार्यक्रमाचा लाभ घेऊ शकतात.

डी. टी. ई.मुंबईचे सहायक संचालक जे.आर. निखाडे, विभागीय कार्यालयाच्या विशेष कर्तव्याधिकारी श्रीमती सदफ शेख व वाय. बी. जामनिक, रिलायन्स जिओ चे डॉ.मुनीर सय्यद, शासकीय पदविका महाविद्यालय, पेण चे प्राचार्य डॉ.सुनील भामरे आदी शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील दिग्गज मान्यवर मंडळी या कार्यक्रमातून विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करणार असून या अनुषंगाने करिअर निवडीबाबत सखोल माहिती देण्यात येईल. या कार्यक्रमातील सहभागी वृंदास ई- प्रमाणपत्र देखील देण्यात येणार आहे. अंजुमन- ए - इस्लाम संस्थेचे अध्यक्ष डॉ.झहीर आय.काझी, जनरल सेक्रेटरी श्री. जी. .आर.शेख, नवी मुंबई शिक्षणसमुहाचे एकझ्यूकेटिव चेअरमन बुरहान हारीस आणि काळसेकर टेक्निकल कॅम्पस चे संचालक डॉ. अब्दुल रझाक होनुटागी यांच्या प्रेरणेने संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमात अधिकाधिक विद्यार्थी आणि पालकांनी सहभाग घेण्याचे आवाहन काळसेकर पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा.रमझान खाटीक यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ७२७६०६८७४३ वा ९६६४६७०८४० या क्रमांकावर संपर्क साधावा.

# जोरदार पावसामुळे बोर्ली स्थानकावर खड्ड्यांचे साम्राज्य



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेले दोन दिवस पडत असलेल्या जोरदार पावसामुळे बोर्ली स्थानकावर मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने रस्त्याची दुरवस्था झालेली असून खडी विखरल्याने वाहनचालकांना वाहने चालवताना कसरत करावी लागते आहे. यामुळे वेळप्रसंगी अपघाताची शक्यता लक्षात घेऊन शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

आतापर्यंत ३४८ मि.मि.रेकॉर्डब्रेक पाऊस मुरुड मध्ये झाला असून याचा जनजीवनावर परिणाम झाला आहे. तालुक्यातील विहूर, नांदगाव, मजगांव, उसरोली, काशिद, बोलली, कोर्लई भागात रस्त्यावर अनेक ठिकाणी पाणी साचल्याने रस्त्याची पुन्हा जैसे थे अवस्था झाली आहे. पावसामुळे बोर्ली स्थानकावरील रस्त्यावर खड्डे पडले असून या खड्ड्यातील खडी इस्तत: विखूरल्याने टू-व्हीलर वाहनाला वेळप्रसंगी अपघाताची शक्यता लक्षात घेऊन शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने यात लक्ष पुरवून उपाययोजना करण्याची मागणी वाहनचालक व ग्रामस्थांतून होत आहे.


अॅड.संजय पाटकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर पनवेल यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.७४०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०८/२१

१) श्री.मधुकर त्रिंबक देशमुख
वय : ७९ वर्षे, व्यवसाय : शेती
२) श्री.रघुनाथ त्रिंबक देशमुख
वय : ७६ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.घर नं.६०२, हनुमान मंदिर जवळ, गव्हाण पोस्ट ऑफिस गव्हाण कोपर, गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

ज्याअर्थी वरील अर्जदार यांचे वडील कै.त्रिंबक रामचंद्र देशमुख हे दि.१६/०३/१९७७ रोजी मयत झाले असून अर्जदार हे त्यांची मुले असून कायदेशीर वारसदार आहेत.

अर्जदार वडील कै.त्रिंबक रामचंद्र देशमुख यांचे नावे व सामाईक मालकीच्या खालील मिळकती होत्या. सदर मिळकतीत त्यांचा हिस्सा होता व आहे. परंतु ते मयत झाल्याने सदर मिळकतीत त्यांचा असलेला हिस्सा त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारसदार म्हणून अर्जदारांना मिळावा म्हणून सदर मिळकतीत असलेल्या हिश्श्याबाबत अर्जदारांनी वारस दाखला मिळावा यासाठी अर्ज केला आहे. सदरच्या मिळकती खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| युनिट केस नं. | गाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| ५२३ | गव्हाण | १७१/५ | ०-०८-० |
| २६९ | गव्हाण | १४४/१+२ | ०-०२-८ |
| | | १३८/८ | ०-०५-३ |

सदर मिळकती ह्या अर्जदार यांचे वडील कै.त्रिंबक रामचंद्र देशमुख यांचे नावे व मालकीच्या होत्या. सदर मिळकतीत त्याचा हिस्सा होता व आहे. परंतु ते दि.१६/०३/१९७७ रोजी मयत झाले असल्याने तसेच त्यांची आई कै. जानकीबाई रामचंद्र देशमुख ह्या व मुलगा कै.अनंत त्रिंबक देशमुख हे देखील मयत झालेले असल्याने त्यांचे पश्चात सदरचे मिळकतीत कै.त्रिंबक रामचंद्र देशमुख यांचा असलेल्या हक्काबाबत अर्जदारांस वारसदाखला मिळावा म्हणून अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी कै.त्रिंबक रामचंद्र देशमुख यांचे नावे असलेल्या वर नमूद केलेल्या मिळकतीत त्यांचा असलेला हिस्सा व हक्कास अर्जदार हे कै.त्रिंबक रामचंद्र देशमुख यांचे कायदेशीर वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनुसार अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार घेतली जाणार नाही.

आज दि.१३/०७/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्याने दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल


# तळा तालुक्यात पावसाला जोरदार सुरुवात ; बळीराजाला मिळाला दिलासा

**दै.रायगड नगरी । तळा**

पंधरा दिवसाच्या विश्रांतीनंतर तळा तालुक्यामध्ये पावसाने जोरदार सुरुवात केली आहे. लावणीच्या काळात पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले होते. मात्र पावसाने हजेरी लावल्याने शेतकर्यां ना दिलासा मिळाला आहे. तालुका डोंगराळ असल्याने उभ्या पाण्याची आधीक गरज असते. भात,नाचणी , वरी या व्यतिरिक्त इतर पीक नसल्याने पावसावर अवलंबून असते. यंदा भात शेतीत आलेले आवण लावणी योग्य झाल्याने बहुतांश शेतकर्यांलनी आपल्या शेतात नांगरणी करुन मातीची फोड देखील करून ठेवली होती. केलेली फोड बेर पाऊस नसल्याने संपूर्ण सुकून गेली होती तर काही ठिकाणी पाण्याअभावी भाताची रोपे पिवळी पडू लागली तर काही जणांनी हंड्याने पाणी आणून रोपे जगवण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे पुन्हा रोपे तयार करावी लागणार कि काय या चिंतेत शेतकरी होता. काही शेतकऱ्यांना शेतात असणाऱ्या पाण्यामुळे पानवल भागातील शेती लावून आटपत आली परंतु वरकस जमीन मालक अक्षरशः आभाळाकडे डोळे लावून वाट पहात होता. परंतु पावसाने दडी मारल्यामुळे लावणीची कामे खोळंबली होती. हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार, तालुक्यामध्ये मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे आता शेतामध्ये पाणी तुंबून शेतकऱ्यांना लावणी करणे शक्य होणार आहे. जवळपास १५ दिवस पावसाने दडी पावसाने दडी मारल्यामुळे कडक ऊन पडत होते. त्यामुळे हवेत उष्ण ते चे प्रचंड प्रमाण वाढले होते. पावसाने मुसळधार सुरुवात केल्यामुळे हवेत चांगल्या प्रमाणात गारवा आला आहे.उष्णतेने त्रासलेल्या नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आहे.तर काहिसा बळीराजा सुखावला आहे. सतत पाऊस कायम राहीला तर शेतकरी भात लावणीतून मोकळा होईल.


श्री.भाकरे सो.कोर्ट
प्रो.जमा १००/- — अर्जदारांकरिता अॅडव्होकेट अॅड.सचिन पुं. केणी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.७४२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३/०९/२१

१) श्रीमती.लीना लक्ष्मण शेडगे
वय : ४१ वर्षे, धंदा : घरकाम
२) कुमारी.रश्मी लक्ष्मण शेडगे
वय : १७ वर्षे, धंदा : शिक्षण
३) कुमार.यश लक्ष्मण शेडगे
वय : १४ वर्षे, धंदा : शिक्षण
वरील १ ते ३ रा.मु.पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की,

१) कै.लक्ष्मण आंबो शेडगे यांचा मृत्यू दि.२२/१०/२०१९ रोजी मु.पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड राहत्या घरी झाला आहे. कै.लक्ष्मण आंबो शेडगे यांच्या मृत्यूपश्चात वरीलपैकी अर्जदार क्र.१ ते ३ हे कै.लक्ष्मण आंबो शेडगे यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत.

२) कै.लक्ष्मण आंबो शेडगे यांनी त्यांच्या मृत्युपूर्वी एक थ्री व्हीलर पॅसेंजर ऑटो रिक्षा (ट्रान्सपोर्ट) दि.२४/०८/२०१८ रोजी खरेदी केली होती. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गाडीचा नंबर | चेसीस नंबर | इंजिन नंबर | इंजिन नंबर |
|---|---|---|---|
| MH46BD0824 | MD2A27AY1JWD 47490 | AZYWJD837 48 | Bajaj Auto RE CNG 4S |
| परमिट नं : MH/46/CC/AUTO/2018/6998 बॅच नं : A003549718 | | | |

३) सदर वरील वर्णनित जंगम मिळकतीचे सक्सेशन सर्टीफिकेट मिळणेकरिता वरील अर्जदार १) श्रीमती.लिना लक्ष्मण शेडगे व वगैरे यांनी मे.दिवाणी न्यायालय, पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

४) वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस सक्सेशन सर्टीफिकेट देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे सक्सेशन सर्टीफिकेट प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१३/०७/२०२१

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



### गाळा विकणे आहे

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९३२१५९२११३/८१०४४७७४०


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## दिड किलो वजनाच्या शुद्ध चांदीच्या धातूची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात चोरट्याने एका दुकानातून दिड किलो वजनाच्या शुद्ध चांदीच्या धातूची चोरी केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

गणपती पवार यांच्या बांठीया चाळ एम.जी.रोड पनवेल येथील अटणीच्या दुकानाचे अज्ञात चोरट्याने ग्रीलचे कुलूप व दरवाजाचा कोयंडा कशाने तरी उचकटून आत प्रवेश करून दुकानातील दिड किलो वजनाचा शुद्ध चांदीच्या धातू ज्याची किंमत जवळपास ६० हजार रुपये इतकी आहे. चोरुन नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## रेल्वे प्रवाशाला लुटणारा आरोपी उत्तर प्रदेशमध्ये जेरबंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोकल मधील प्रवाशाला मारहाण करुन त्याचा मोबाईल फोन लुटून फरार झालेल्या त्रिकुटापैकी एका आरोपीला उत्तर प्रदेश मधून अटक करण्यात वाशी रेल्वे पोलिसांना यश आले आहे.

मोहम्मद आरिफमनी अन्सारी (२०) असे या आरोपीचे नाव असून रेल्वे पोलिसांनी त्याच्याकडून मोबाईल हस्तगत केला आहे. पोलिसांनी आता या आरोपीच्या इतर दोन साथीदारांचा शोध सुरू केला आहे. पनवेलच्या विचुंबे गावात राहणारा विकास हनुमंता संदीपोग (२९) १९ फेब्रुवारी रोजी रात्री हार्बर रेल्वे मार्गावरुन वडाळा ते पनवेल असा लोकलने प्रवास करत होता. सदर लोकल सीवुडस् रेल्वे स्थानकात आल्यानंतर लोकलमध्ये चढलेल्या तिघा लुटारुंनी विकास संदीपोग याला मारहाण करुन त्याला रेल्वे स्थानकात उतरवून त्याच्या जवळचा रेडमी कंपनीचा मोबाईल फोन लुटून पोबारा केला होता. याबाबत वाशी रेल्वे पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर रेल्वे पोलिसांनी या गुन्ह्यातील आरोपींचा शोध सुरु केला होता.

तपासादरम्यान सदर गुन्ह्यातील आरोपी उत्तर प्रदेश मधील सुल्तानपूर येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार वाशी रेल्वे पोलिसांनी आरोपींचे मोबाईल क्रमांक मिळवून सायबर शाखेच्या मदतीने त्यांचा ठावठिकाणा शोधला असता ते उत्तर प्रदेश मधील अमेठी भागात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यांनतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू केसरकर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर प्रदेश येथे गेलेल्या पोलिसांच्या पथकाने आरोपीचा शोध घेतला असता मोहम्मद आरिफ मनी अन्सारी त्यांच्या हाती लागला. त्यांनतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन नवी मुंबईत आणले.

न्यायालयाने त्याला १२ जुलै पर्यंत पोलीस कोठडी ठोठावली आहे. दरम्यान, आरोपी कडून सदर गुन्ह्यात लुटला गेलेला रेडमी कंपनीचा मोबाईल फोन हस्तगत करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू केसरकर यांनी दिली. तर फरार असलेल्या इतर दोन आरोपींचा शोध घेण्यात येत असल्याचेही केसरकर यांनी सांगितले.

# कशेडी घाटात खासगी रस्त्यासाठी केलेल्या माती उत्खननामुळे दरडींची टांगती तलवार



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर कशेडी घाटाच्या पोलादपूरपासून प्रारंभीच चोळई गांवठाणालगत खासगी रस्त्याच्या कामामुळे मोठ्या प्रमाणात भूस्खलनाची दाट शक्यता निर्माण झाली असल्याची बातमी दि. ५ जून २०२१ रोजी विविध वृत्तपत्रांतून प्रसिध्द झाली. यानंतरही पोलादपूरच्या महसूल विभागाने या घटनेचे गांभिर्य लक्षात न घेता केलेल्या दूर्लक्षामुळे सोमवारी सायंकाळी याच भागात दरडी कोसळण्यास सुरूवात झाल्याने संतप्त ग्रामस्थांनी पंचायत समिती आणि तहसिल कार्यालयाला कळवून दरडी कोसळणाऱ्या ठिकाणी घोळक्याने वाट पाहण्यास सुरूवात केली. यावेळी प्रभारी तहसिलदार समीर देसाई यांनी घटनास्थळी पाहणी करून हा प्रसंग सामंजस्यपूर्वक हाताळला. मात्र, अद्याप संबंधितांनी केलेल्या बेकायदेशीर उत्खनन आणि विनापरवानगी रस्त्यासाठी महामार्गाला धोका पोहोचविण्याच्या प्रयत्नांबाबत प्रशासनाकडून कोणतीही कारवाई केली नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

कशेडी घाटाच्या प्रारंभी सडवली ग्रामपंचायत हद्दीतील चोळई गावाच्या हद्दीत गेल्या अनेक वर्षांपासून बेकायदेशीर माती उत्खनन सुरू असून यामुळे अनेकवेळा भूस्खलन होऊन दरडी कोसळण्याच्या तसेच महामार्गावर लालमातीचे ढिगारे कोसळण्याच्या घटना होऊन वाहतुकीला अडथळा निर्माण झाला आहे. अशातच, यंदा दि. २ ते ४ जुन २०२१ रोजी चोळई येथे उद्योजक संतोष मेढेकर यांच्या जमिनीपर्यंत मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गापासून रस्ता करण्यासाठी बेकायदेशीररित्या माती उत्खनन करण्यात आले. यामुळे पावसाळ्यात भूस्खलन होऊन दरडी कोसळण्याची शक्यता असल्याची बातमी प्रस्तुत प्रतिनिधीने घटनास्थळी जाऊन केलेल्या पाहणीअंती प्रसिध्द केल्यानंतरही महसूल विभागाने संबंधित कामाचा पंचनामा करून कोणत्याही प्रकारचे लेखी आदेश न करता उलटपक्षी ग्रामस्थांनी तहसिलदार दिप्ती देसाईंकडे तक्रार केल्यानंतर ग्रामस्थांना बोलवून त्यांचे म्हणणे ऐकून तहसिलदार दिप्ती देसाई यांनी संतोष मेढेकर यांना फोन करून परिस्थितीसंदर्भात सर्व माहिती दिली, असे यावेळी संतोष मेढेकर यांनीच ग्रामस्थांसमोर सांगून प्रशासन आपणास अनुकूल असल्याचे स्पष्ट केले होते.

सोमवारी सायंकाळी पावसाचा जोर वाढल्यानंतर ज्याठिकाणी बेकायदेशीर रस्ता करण्यासाठी उत्खनन केले होते त्यापरिसरामध्ये मोठ्या प्रमाणात लालमातीचा ढिगारा महामार्गाच्या दिशेने घसरला आणि त्या ढिगाऱ्यामध्ये असलेल्या मोठा दगड घसरत आला आणि खाली महामार्गालगत रचलेल्या दगडांच्या ढिगाऱ्यावर येऊन जोरदार आवाज करीत स्थिरावला. या आवाजाने ग्रामस्थ भयभीत होऊन महामार्गावर जमा झाले. या प्रकाराबद्दल ग्रामस्थांनी पंचायत समिती आणि पोलादपूर तहसिल कार्यालयाला फोन करून कळविले. यावेळी पंचायत समितीमधील कर्मचारी तसेच महसूल विभागाकडून मंडल अधिकारी मुंडेकर आले. मुंडेकर यांनी उद्योजक संतोष मेढेकर यांनी मागील वेळी कोणतेही लेखी स्वरूपात आश्वासन दिले नसल्याचे कबूल केले. यानंतर प्रभारी तहसिलदार समीर देसाई व नायब तहसिलदार शरद आडमुठे यांनी घटनास्थळी येऊन भूस्खलनाची पाहणी केली आणि संतप्त ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून घेत उद्योजक संतोष मेढेकर आणि ग्रामस्थांना चर्चेसाठी तातडीने हजर राहण्याची विनंती केली.

# इंदापूर व लोणेरे मधील शेतकरी मोबदल्यापासून वंचित ?

**दै.रायगड नगरी । माणगाव**

इंदापूर ते लोणेरे या परिसरातील ज्या शेतकऱ्यांच्या जागा रस्त्यासाठी संपादित झाल्या आहेत अशा काही शेतकऱ्यांना आज पर्यंत मोबदला मिळाला नाही. ते शेतकरी मोबदल्या पासून वंचित आहेत. मागील दोन वर्षा पासून शेतीत भात पिकांची लागवड केली जात नाही व मोबदला सुद्धा वेळेवर मिळत नसल्यामुळे शेतकरी व्याजा सहित मोबदला मिळण्याची मागणी करीत आहेत.

शासनाने जाहीर सुद्धा केले आहे की मुंबई - गोवा हा महामार्ग डिसेंबर २०२२ पर्यंत पूर्ण होणार आहे. परंतु जे शेतकरी मोबदल्या पासून वंचित आहेत त्यांचे काय होणार असा प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत आहे. या शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे रायगड रत्नागिरीचे खासदार तटकरे रायगडच्या पालकमंत्री अदितीताई तटकरे महाड माणगाव पोलादपूरचे आमदार भरत शेठ गोगावले लक्ष देतील का? कोकणात गणेशोत्सव सण जवळ येत असून मुंबई येथे असलेले चाकरमानी या गणेशोत्सव साठी गावाकडे मोठया संख्येने येत असतात. शेतकरी मोबदल्या पासून वंचित आहेत. त्या मध्ये कोरोना महामारीचे संकट आले आहे. लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. बेरोजगारी वाढली असून अनेक कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. परंतु कोकणातील शेतकरी हे शांत सर्व संकटाना सामोरे जात आहेत. रोजगार सुरु करण्यासाठी शासनाने लक्ष द्यावे. तसेच मुंबई - गोवा महामार्गसाठी ज्या शेतकऱ्यांच्या जागा संपादित झाल्या आहेत त्या मोबदल्या पासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना त्वरित मोबदला मिळावा अशी या विभागातील शेतकऱ्यांची मागणी आहे.

# दुकानाचे शटर तोडून रोख रकमेची रुपयांची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर येथे सिलेक्शन सेंटर स्पोर्ट्स या दुकानाचे शटर तोडून चोरट्यांनी अकरा हजार सहाशे रुपये चोरून नेले आहेत. त्यांच्या विरोधात खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उलवे येथील राहुल किशोर गावंडे हे खारघर सेक्टर २१ येथील सिलेक्शन सेंटर स्पोर्ट येथे मॅनेजर म्हणून काम करतात. त्यांच्या दुकानाचे शटर तोडून चोरट्यांनी अकरा हजार सहाशे रुपये चोरून नेले आहेत. तसेच सीसीटीव्ही कॅमेराची देखील तोडफोड केली आहे. त्यामुळे चोरट्याचे सीसीटीवी फुटेज मिळू शकलेले नाहीत.

# उरणमध्ये ऑनलाईन अपॉइंटमेंटमुळे कित्येक नागरिक कोव्हीशिल्डच्या दुसऱ्या डोसपासून वंचित

**दै.रायगड नगरी । उरण**

काल १२ जुलै रोजी उरण नगरपरिषद शाळेत लसीकरणाच्या मोहिमे अंतर्गत कोव्हीशिल्डचा दुसरा डोस १५० जणांना देण्यात आला. मात्र लसीकरण पध्दतीत बदल केल्याने पहाटे ५ पासून लाईन मध्ये असणाऱ्यांना लस न मिळाल्याने घरी परतावे लागले. उरण मध्ये ८ जुलै पासून लस उपलब्ध नव्हती. १२ जुलैला कोव्हीशिल्ड लशीचा दुसरा डोस ज्याचे ८४ दिवस पूर्ण झाले ते ४५ वर्षावरील नागरीक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. मात्र नोटीस बोर्डावर सर्व लाभार्थ्यांनी ऑनलाईन शड्युल व अपॉइंटमेंट बुक करून येणे असे लिहीले होते.सोबतच ऑनलाईन अपॉइंटमेंट सकाळी १० वाजता असे होते. लस घेण्यासाठी आलेल्या कित्येकांच्याकडे साधा मोबाईल होता. त्यामध्ये ८४ दिवस पूर्ण झाल्याचा संदेश होता. मात्र हा मोबाईल ऑनलाईन अपॉइंटमेंटसाठी निरोपयोगी ठरला.

कित्येकांना नेट असणा-या मोबाईलमध्ये १० वाजता नेटवर्क अभावी नोंदणी करता आली नाही साधारण १० मिनीटात साईट बंद झाली. परिणामी कित्येकांना लस न घेताच घरचा रस्ता धरावा लागला. खरं तर ज्यांचे ८४ दिवस पूर्ण झाले आहेत त्यांच्या मोबाईलवरील संदेश पाहून लस देता आली असती. परंतु जनतेला हेलपाटे मारावे लागावे या करीता दुसऱ्या डोस घेण्यासाठी सुध्दा ऑनलाईन अपॉइंटमेंट सुरू केलेली दिसते आहे. यामळे जेष्ठ नागरिकांना तर त्रास झाला परंतु आता पहिला डोस घेऊन १०० दिवस झालेल्या नागरिकांना देखिल लस न मिळाल्याने घरी परतावे लागले आहे. कित्येक जण कामावर न जाता लस घेण्यासाठी आले होते.दुसऱ्या डोस घेण्यासाठी ऑनलाईन अपॉइंटमेंट पध्दत बंद करून ८४ दिवस पूर्ण झालेल्या नागरिकांना लस उपलब्ध करून द्यावी अशी मागणी उरणमधील नागरीक व महिलांकडून करण्यात आहे.


## हरविले आहे

जी ॲण्ड एम ट्रान्सपोर्ट कंपनी, ठाणा नाका, पनवेल, जि.रायगड-४१०२०६ या कंपनीचे लोडींग बुक KKD35097 ते KKD35100 असे ४ नग व KKD35201 ते KKD35250 असे ५० नगांचे बुक गार्डन हॉटेल परिसर, पनवेल येथे कोठेतरी पडून गहाळ झाले आहेत. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाणे मिसिंग रजि नं.११३९/२०२१ दि.१०/०७/२०२१ रोजी नोंद केली आहे.

सदरचे लोडींग बुक कोणाला सापडली असल्यास वरील पत्यावर आणून द्यावीत अथवा अनिल रामचंद्र गायकवाड यांच्याशी संपर्क साधावा. तसेच वरील कागदपत्रांचा काही गैरव्यवहार झाल्यास त्याला कंपनी जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
जी ॲण्ड एम ट्रान्सपोर्ट कंपनी


मा.गोडसे साहेब यांचे कोर्ट

ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.७८०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०८/२१

कै.डॅनियल पंजाबराव पाटोळे मयतचे वारस
१) श्रीमती.शिरीन डॅनियल पाटोळे
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
२) सौ.कल्याणी नोहा संकट
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
३) कु.ऋत्विक डॅनियल पाटोळे
वय : २३ वर्षे, धंदा : शिक्षण
वरील १ ते ३, प्रजापती गार्डन, जी-००१,
प्लॉट नं.३९, सेक्टर ०५, डी मार्ट जवळ,
न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. डॅनियल पंजाबराव पाटोळे यांचे दि.०१/०४/२०२१ रोजी मेट्रोकेअर हॉस्पिटल, कामोठे येथे निधन झाले असून कै.डॅनियल पंजाबराव पाटोळे यांची आई कै.प्रिताबाई उर्फ प्रितीबाई पंजाबराव पाटोळे यांचे दि.१३/०२/२०२० रोजी प्रभाग नं.१६, सिंधी कॅम्प, अकोला (म.कॉर्प), अकोला, जि.अमरावती येथे निधन झाले असून, श्रीमती.शिरीन डॅनियल पोटोळे, वगैरे ह्यांनी कै. डॅनियल पंजाबराव पाटोळे यांच्या खालील वर्णनाची मिळकतीचे व बँकेतील रक्कमेबाबत वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

२) कै.डॅनियल पंजाबराव पाटोळे यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या बँक खात्यामध्ये असलेल्या रक्कमेचा तपशिल :-

**रक्कमेचे वर्णन**
**बँक ऑफ इंडिया, शाखा नवीन पनवेल,**
**खाता क्र.१२३६१०१०००६५४८**
**खातेदाराचे नाव : कै.डॅनियल पंजाबराव पाटोळे**
**जमा रक्कम : २८,११८/-**
**(अक्षरी रक्कम रु.अठ्ठावीस हजार एकशे अठरा मात्र)**
**कै.डॅनियल पंजाबराव पाटोळे यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या वडिलोपार्जित मालकीची अशी खालील स्थावर मिळकत होती.**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती**

| मौजे | शिट नंबर | प्लॉट नं. | चौ.फूट | हक्क प्रकार |
|---|---|---|---|---|
| परतवाडा | १० | २२ | ७१४ | बी |

**च्या अर्ध्या क्षेत्राकरिता**

| मौजे | शिट नंबर | प्लॉट नं. | क्षेत्र | चौ.फूट | हक्क प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| परतवाडा | १० | २२ समोरील मोकळी जागा | १७×२५ | ४५२ | बी |

**च्या अर्ध्या क्षेत्राकरिता**

वरील मिळकत व बँकेतील रक्कम ही कै.डॅनियल पंजाबराव पाटोळे यांच्या मालकीची आहे. श्रीमती.शिरीन डॅनियल पाटोळे, वगैरे हे कै.डॅनियल पंजाबराव पाटोळे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.शिरीन डॅनियल पाटोळे, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.डॅनियल पंजाबराव पाटोळे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१२/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.गोडसे मॅडम

अर्जदारातर्फे वकील
सौ.सारिका शेगट / लबडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.७०६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०८/२१

१) श्री.संतोष पांडुरंग माळी
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
२) श्रीमती.राजूबाई पांडुरंग माळी
वय : ७० वर्षे, धंदा : गृहिणी
दोघे रा.मु.कासप, पो.आपटा,
ता.खालापूर, जि.रायगड
३) सौ.सुश्मिता एकनाथ रहाटे
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.धाटाव, ता.रोहा, जि.रायगड
४) सौ.दर्शना दशरथ मसणे
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.आंबोट, पो.गौळवाडी,
ता.कर्जत, जि.रायगड अर्जदार

अर्ज मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदीनुसार वारस दाखला मिळणेकरिता...

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

१) ज्याअर्थी कै.पांडुरंग सहदेव माळी हे दि.०४/०६/२०१४ रोजी मरण पावले आहेत, तसेच रमेश पांडुरंग माळी हा दि.२९/११/२००१ रोजी अविवाहित मरण पावला असून कै.पांडुरंग सहदेव माळी यांच्या सामाईक मालकीच्या पुढीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकती महाराष्ट्र इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट ॲक्ट १९६१ च्या तरतुदींप्रमाणे पाताळगंगा एम.आय.डी.सी.करिता ॲक्वीझिशन केस नं. LAQ/SR-1/22/26 अन्वये संपादीत करण्यात आल्या आहेत.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : कासप, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ. क्र. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र ए.गुं.आणा | नुकसान भरपाईची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १८ पै | - | ०-८-० | |
| २ | ४१ | १ | ०-३७-५ | |
| ३ | ४१ | ५ | ०-२८-१ | ५२,९७७/- |

आता सदर संपादीत मिळकतीच्या संपादनापोटी एम.आय.डी.सी. सदर मयत पांडुरंग सहदेव माळी यांस वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारा भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत पांडुरंग सहदेव माळी यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने / इसमांनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.८ माहे ०७ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.गोडसे मॅडम

अर्जदारातर्फे वकील
सौ.सारिका शेगट / लबडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.६७१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०८/२१

१) श्री.शिवाजी भिम माळी
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
२) श्री.मनोहर भिम माळी
वय : ६० वर्षे, धंदा : नोकरी / शेती
१ व २ रा.मु.कासप, पो.आपटे,
ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.राधा बामा कोंडीलकर
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.जांभिवली, पो.आपटा,
ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.शारदा गणपत केदारी
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.जांभिवली तर्फे बोरेती, पो.चौक,
ता.खाालापूर, जि.रायगड अर्जदार

अर्ज मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदीनुसार वारस दाखला मिळणेकरिता...

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

१) ज्याअर्थी कै.भिम दामा माळी हे दि.१२/०८/१९९६ रोजी मरण पावले असून त्यांची पत्नी व अर्जदार नं.१ ते ४ ची आई काशिबाई भिम माळी ही दि.१७/०९/२०१९ रोजी मरण पावली आहे व ज्याअर्थी सदर मयत भिम दामा माळी यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची मिळकती महाराष्ट्र इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट ॲक्ट १९६१ च्या तरतुदींप्रमाणे पाताळगंगा एम.आय. डी.सी.करिता ॲक्वीझिशन केस नं. LAQ/SR-1/22/26 अन्वये संपादीत करण्यात आल्या आहेत.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : कासप, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ. क्र. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र ए.गुं.आणा | नुकसान भरपाईची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १८ पै | - | ०-८-० | |
| २ | ४१ | १ | ०-३७-५ | |
| ३ | ४१ | ५ | ०-२८-१ | ५२,९७७/- |

आता सदर संपादीत मिळकतीच्या संपादनापोटी एम.आय.डी.सी. सदर मयत भिम दामा माळी यांस वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारा भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत भिम दामा माळी यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने / इसमांनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१२ माहे ०७ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.राव साहेब

अर्जदारातर्फे वकील
सौ.सारिका शेगट / लबडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.७०७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०८/२१

१) श्री.सिताराम बाळु माळी
वय : ६५ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
२) श्री.हरिश्चंद्र बाळु माळी
वय : ५८ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
३) श्री.प्रभाकर बाळु माळी
वय : ५६ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
१ ते ३ रा.मु.कासप, पो.आपटे, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.राधा कृष्णा माळी
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.जांभिवली, पो.आपटा, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.अनिता मोतीराम गावडे
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.जांभिवली तर्फे बोरेती, पो.चौक,
ता.खालापूर, जि.रायगड अर्जदार

अर्ज मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदीनुसार वारस दाखला मिळणेकरिता...

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

१) ज्याअर्थी कै.बाळु दामा माळी हे दि.१५/०२/२००४ रोजी मरण पावले असून, त्यांची पत्नी व अर्जदार नं.१ ते ५ यांची आई द्रोपदी बाळु माळी ही दि.१६/०५/२०१९ रोजी मरण पावली आहे, व ज्याअर्थी सदर मयत बाळाराम सहदेव माळी यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीच्या पुढीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकती महाराष्ट्र इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट ॲक्ट १९६१ च्या तरतुदींप्रमाणे पाताळगंगा एम.आय.डी.सी.करिता ॲक्वीझिशन केस नं. LAQ/SR-1/22/26 अन्वये संपादीत करण्यात आल्या आहेत.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : कासप, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ. क्र. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र ए.गुं.आणा | नुकसान भरपाईची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १८ पै | - | ०-८-० | |
| २ | ४१ | १ | ०-३७-५ | |
| ३ | ४१ | ५ | ०-२८-१ | ५२,९७७/- |

आता सदर संपादीत मिळकतीच्या संपादनापोटी एम.आय.डी.सी. सदर मयत बाळु दामा माळी यांस वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारा भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत बाळु दामा माळी यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने / इसमांनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०७ माहे ०७ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

## संक्षिप्त...

### चौघांनी केली मारहाण, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चार ईसमानी २९ वर्षीय ईसमाला मारहाण केली आहे. या मारहाणीत २९ वर्षे इसम जखमी झाला आहे. आरोपींविरोधात कळंबोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जयहिंद अर्जुन विश्वकर्मा हा पनामा कंपनी येथे नोकरीसाठी गेला होता. या ठिकाणाहून तो पडघामार्गे पायी चालत कळंबोली बाजूकडे येत होता. त्याने एक रिक्षा थांबवली. या रिक्षेतून बसून तो पुढे आला. मात्र ती रिक्षा वाशी येथे जाणार असल्याने त्याने कळंबोली सर्कल येथे सोडतो असे सांगितले. यावेळी रिक्षाचालक व रिक्षात असलेल्या तीन इसमांनी त्याच्याशी वाद सुरू केला. त्यानंतर कळंबोली सर्कलकडे येत असताना जयहिंद रिक्षाच्या खाली उतरला. यावेळी रिक्षाचालक व त्याच्यासोबत असलेल्या तीन इसमांनी जयहिंद त्याच्याशी भांडण केली. व त्याला हातावर त्यांनी मारहाण केली. तसेच रिक्षात असलेल्या लोखंडी रॉडने त्याला मारहाण केली व जखमी केले.

### मोटार सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील हॉटेल नित्यानंद ज्येष्ठ नागरिक हॉल समोर उभी करून ठेवलेली मोटार सायकल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

अब्दुल रहीम शेख यांनी त्यांची ४० हजार रुपये किंमतीची होंडा कंपनीची सीबी शाईन ग्रे रंगाची मोटार सायकल वरील ठिकाणी उभी केली असता अज्ञात चोरट्याने सदर मोटार सायकल चोरून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### नागोठणे मोहल्ल्यातून नव्या कोऱ्या दुचाकीची चोरी

**दै.रायगड नगरी । वाकण**

केवळ दोन महिन्केच वापरलेली नवी कोरी दुचाकी चोरी होण्याचा धक्कादायक प्रकार नागोठण्यातील हुजरा मोहल्ला भागातून सोमवार दि. १२ जुलै च्या मध्यरात्री घडला आहे. होंडा कंपनीच्या ग्राझिया स्कुटी हे मॉडेल असलेल्या लाल-काळ्या रंगाच्या या दुचाकीचा क्रमांक एमएच ०६ सीई ३७७७ असा असून या दुचाकीची किंमत सुमारे ८० हजार रुपये आहे. या दुचाकीचा शोध घेऊनही ती न सापडल्याने गाडी मालक आदिल शब्बीर पानसरे यांनी नागोठणे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

यासंदर्भात उपलब्ध माहितीनुसार नागोठण्यातील मुंबई-गोवा महामार्गालगत असलेल्या हॉटेल जायकाचे मालक आदिल पानसरे हे ११ जुलै रोजी रात्री १० वाजता घरी आल्यानंतर त्यांनी आपली ही गाडी घरासमोरील पार्किंग मध्ये उभी केली होती. त्यानंतर १२ जुलैला सकाळी ६ वाजता हॉटेल मध्ये जाण्यासाठी गाडी घेण्यास आदिल पानसरे आले असता त्यांना आपली ही गाडी पार्किंग मध्ये दिसली नाही. मोहल्ल्यातील त्यांच्या घरा शेजारी आजूबाजूला शोध घेवूनही गाडी न सापडल्याने ही गाडी चोरीला गेल्याची खात्री झाल्यानंतर आदिल पानसरे यांनी नागोठणे पोलिसांतकेलेल्या तक्रारीनुसार अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी नागोठणे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# उरण पंचायत समितीच्या आवारात गटाराचे पाणी

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

उरण पंचायत समिती आणि उरण नगर पालिका यांच्या ढिसाळ कारभारामुळे चक्क गटारातील घाणीचे पाणी उरण पंचायत समितीच्या आवारात येत आहे. त्यामुळे जनतेच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी डंका वाजविणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांचे आरोग्यच धोक्यात आले आहे. अशी प्रतिक्रिया कार्यालयात ये- जा करणारे नागरिक व्यक्त करीत आहेत.

उरण नगर पालिका व उरण पंचायत समितीच्या माध्यमातून शहरात, ग्रामिण भागा- तील गटारांची डागडुजी, साफ सफाई करण्याची कामे लाखो रुपये खर्च करून पावसाळ्यापूर्वी हाती घेण्यात आली.

परंतु जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने डंका वाजविणाऱ्या उरण नगर पालिका व उरण पंचायत समिती कार्यालयाच्या प्रवेशद्वार- जवळील गटाराच्या कामाकडे लक्ष केंद्रित करण्यास मुख्याधिकारी व गटविकास अधिकारी यांनाच वेळ मिळाला नाही. त्यामुळे आज पावसाळ्यातील गटारातील घाणीचे पाणी उरण पंचायत समितीच्या आवारात येऊ लागले आहे. अशा घाणीच्या पाण्यातून कार्यालयात कामा निमित्त ये-जा करणाऱ्या नागरिकांना मार्गक्रमण करावा लागत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळत आहे.



## माथेरान शटल सेवेच्या फेऱ्यामध्ये वाढ

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानकरांसाठी आणि पर्यटकांसाठी आनंदाची बातमी असून आज दि. १३ जुलै पासून शटल सेवेच्या फेऱ्यामध्ये वाढ करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला असल्याने स्थानिकांसह पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण दिसत आहे. अमन लॉज ते माथेरान रेल्वे स्टेशन दरम्यान सोमवार ते शुक्रवार ६-६ फेऱ्या शनिवार-रविवार १०-१० फेऱ्या करण्यात आल्या आहेत.

यासाठी माननीय खासदार अप्पासाहेब बारणे, रेल्वेचे व्यवस्थापक शलभ गोयल आणि संबंधित रेल्वे अधिकारी वर्गाचे यासाठी विशेष सहकार्य लाभले आहे. याकामी नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले आहेत.

पावसाळ्यात नेरळ ते माथेरान दरम्यान मिनिट्रेन सेवा चार महिने बंद करण्यात येते. त्यामुळे अनेकदा पर्यटकांचा पुरता हिरमोड होत असतो परंतु स्वतःच्या वाहनाने अथवा खाजगी वाहनाने माथेरानचे मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाक्यावर उतरल्यावर गावात येण्यासाठी घोडा आणि हातरीक्षाचे अवाजवी न परवडणारे दर असल्याने मध्यमवर्गीय पर्यटकांना ही खूपच खर्चिक बाब असते.

यासाठी दस्तुरी जवळील अमन लॉज रेल्वे स्टेशन ते माथेरान स्टेशन दरम्यान शटल सेवेच्या फेऱ्यात वाढ करण्यात आली आहे. ही वाढ व्हावी यासाठी सर्व राजकीय पक्षांनी वरिष्ठांना निवेदने सादर केली होती. नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता तर बारणे यांनी सुध्दा रेल्वेच्या व्यवस्थापक यांना याबाबत सूचना करून माथेरानकर आणि पर्यटकांसाठी शटल सेवेच्या फेऱ्यात वाढ करावी जेणेकरून इथल्या सर्वसामान्य लोकांना शटल सेवेच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील त्यानुसार रेल्वे प्रशासनाने दि.१३ जुलै पासून ह्या फेऱ्यात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.




अमन लॉज ते माथेरान

शनिवार - रविवार, सकाळी ०८-४०, ११-५५,१५-०५ आणि सायंकाळी १७-३५ सोमवार ते शुक्रवारी सकाळी ०९-५५, १०-४५, दुपारी १२-४५ ,१४-०० ,१५-५५ ,१६-४५

माथेरान ते अमन लॉज रेल्वे स्टेशन

शनिवार-रविवारी सकाळी ०८-१५, ११-२५ दुपारी १४-४०, १७-१० सोमवार ते शुक्रवारी सकाळी ०९-३०, १०-२० दुपारी १२-२०, १३-३५, सायंकाळी १५-३०, १६-२०

## गावातील तब्बल ५०० नागरिकांना कोविड प्रतिबंधात्मक लसीचा डोस

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतातील सर्वात वेगाने वाढणार्या मॅन्युफॅक्चरिंग स्टार्ट अप्सपैकी एक असलेल्या रुनाया समुहाने, कोविड-१९ संकटावर मात करण्यात सरकारच्या प्रयत्नांमध्ये सहभागी होत अलिबाग तालुक्यातील नवेदर नवगाव गावात एक लसीकरण मोहीम राबविली.यामध्ये तब्बल ५०० नागरिकांना कोविड प्रतिबंधात्मक लसीचा डोस देण्यात आला.

रायगड जिल्ह्यात विशेषतः अलिबाग भागात, गेल्या काही आठवड्यांमध्ये कोविडच्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. ही बाब लक्षात घेत, कंपनीने ब्रीच कँडी हॉस्पिटल ट्रस्टशी करार करून नवेदर नवगाव या गा- वात सुमारे ५०० नागरिकांना लसी देण्याची व्यवस्था केली. या उपक्रमामुळे येथील बहुतांश ग्रामस्थांना कोविड लसीचा पहिला डोस मिळू शकला. वेदांत समुहाचे उपाध्यक्ष नवीन अग्रवाल यांचे पुत्र आणि'रुनाया'चे सहसंस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी अनन्य आगरवाल यांच्या मार्गदर्शनाखाली या लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाविषयी बोलताना अनन्य अग्रवाल म्हणाले, सध्याच्या कोरोना साथीच्या काळात 'रुनाया'तर्फे हे समाजहिताचे काम हाती घेण्यात आले आहे. गेल्या महिन्यात या भागात कोविडच्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याने आम्ही येथे लसीकरण शिबिर आयोजित करण्याचा निर्णय घेतला. आमच्या या लसीकरण मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळाल्याचा मला आनंद आहे. पुढील काही दिवसांत आम्ही आपल्या समाजाच्या हितासाठी अशा आणखी लसीकरण शिबिरांचे आयोजन करणार आहोत. सोमवारच्या लसीकरण मोहिमेत नवेदर नवगाव ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक शेखर बाली आणि नवेदर नवगाव ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय अधिकारी प्रार्थना भोईर हे उपस्थित होते.

यावेळी प्रशासकीय अधिकारी प्रार्थना भोईर यांनी म्हंटले कि, प्रत्येकाला वेळेत लस दिल्याने, कोविड-१९ विरुद्धच्या लढ्यात विजय मिळविण्याची संधी उत्तम प्रकारे साधता येणार आहे. या मोहिमेतून आमच्या नागरिकांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याचे एक कृतीशील पाऊल उचलले गेले. त्याबद्दल आम्ही अनन्य आणि रुनाया समुहाचे आभारी आहोत. वेदांत समुहाचा एक महत्त्वपूर्ण भागीदार असलेला रुनाया समूह हा नैसर्गिक संसाधन क्षेत्रात नाविन्यपूर्ण सोल्यूशन्स तयार करण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करतो.

ही कंपनी शाश्वत व्यवसाय पद्धतींवर भर देते. स्थानिक समुदायांच्या उन्नतीसाठी व कल्याणासाठी तिने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. त्या अनुषंगाने ग्रामीण भागात केलेल्या या लसीकरण मोहिमेमुळे एक सामाजिक बांधिलकीचा उत्तम उदाहरण पाहण्यास मिळाले आहे.

## केवायसी अपडेटच्या बहाण्याने रेल्वे गार्डची केली फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोबाईल नंबरची केवायसी अपडेट करण्याच्या बहाण्याने एका सायबर चोरट्याने रेल्वे गार्डच्या मोबाईलवर लिंक पाठवून त्याद्वारे रेल्वेच्या गार्डकडून संपूर्ण माहिती घेवून त्याच्या खात्यातून ५९ हजार रुपयाची रक्कम परस्पर काढून घेतल्याने त्याच्या विरोधात पनवेल रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

कुंदन मोरे असे फसवणूक झालेल्या रेल्वे गार्डचे नाव असून ते पनवेल रेल्वे स्थानकातून पेण येथे कामावर जात असताना यावेळी चोरट्याने केवायसी अपडेट करण्याचा व केवायसी अपडेट न केल्यास त्यांचा मोबाईल फोन बंद होईल असा मेसेज त्यांच्या मोबाईलवर पाठविला. तसेच कस्टमकेअरचा नंबर म्हणून एक मोबाईल नंबर दिला. त्यावर मोरेंनी संपर्क साधला असता समोरील व्यक्तीने त्यांना एक लिंक पाठवून त्यात माहिती भरण्यास सांगितले. त्यानुसार मोरे यांनी १० रुपये फि ऑनलाईन पाठविली. काही वेळातच त्यांच्या बँक खात्यातून प्रथम ४५ हजार व काही वेळा नंतर १४ हजार रुपये रक्कम वजा झाल्याचा त्यांना मेसेज आला. आपल्या बँक खात्यातून अज्ञात व्यक्ती पैसे काढून घेत असल्याचे त्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी पेण येथे उतरुन बँकेत जावून आपले खाते बंद करून घेतले व पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात येवून याबाबत अज्ञात इसमावर सायबर गुन्हा दाखल केला आहे.

### खारघरमध्ये भगवान जगन्नाथ रथयात्रा महोत्सव सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र ओडिया वेलफेअर असोसिएशनच्या वतीने खारघर मध्ये भगवान जगन्नाथ रथयात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. महाराष्ट्र ओडिया वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने खारघर, सेक्टर-५ मधील जगन्नाथ मंदिरात महोत्सव सुरु आहे. कोरोना महामारीमुळे रथ यात्रास मनाई असल्यामुळे मंदिरात रथ पुजन करुन भगवान जगन्नाथ, बहीण सुभद्रा आणि मोठे भाऊ बलभद्र या तिघांच्या मूर्तीचे पुजन करण्यात आले.

## पाऊस जास्त पडला नाही पडला तरी बळीराजाच्या जीवाला घोर कायम

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

पावसाळी शेती अत्यंत धोकादायक झाली आहे. काही दिवसांपूर्वी पाऊसाने विश्रांती घेतली. भातशेती रोप करपून जाण्याची परिस्थिती आली होती. आता मात्र लावणी केलेली भातशेती वाहून जाण्याची भिती निर्माण झाली आहे. निसर्गाचे संतुलन बिघडले आहे. त्यामुळे पावसाळी शेतीवर अवलंबुन राहणे कठीण जाहले आहे. रायगडात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस माणगांव तालुक्यातही मुसळधार पाऊस पण नदीला फारसे पाणी सोमवार दुपार पर्यंत तरी वाढले नव्हते. पाऊस सलग पडत राहिला व डोंगरदरीत जोरदार पाऊस लागला तरच पुराचे पाणी दिसते, आणि दोन तिन तास पाऊस थांबला कि वेगाने नदीच्या पाण्याची पातळी कमी होते.



आमावस्येच्या आधी पासुन पाच तारखेला पुनर्वसू नक्षत्र अर्थात पोरे उंदीर वाहनावर सुरु आहे. या नक्षत्रात पाऊस सरसर येणार, पोरां प्रमाणे धावणार आणि जाणार! असं जुनी जाणती माणस म्हण- तात. मात्र आता तर जोरदार लागतोय पाऊस, पूर्वी एक दोन उतव म्हणजे पूर येऊन गेल्याशिवाय यंदा पाऊस झालाच नाही! असं त्यावेळी बोलल जायच. पण आता मात्र पाऊस थोडासा जास्त झाला, कि लगेच सगळीकडे तुंबलेल्या पाण्याचे फोटो व्हायरल होतात आणि भितीचे वातावरण निर्माण होते.

मुरुड नांदगाव ला ढगफूटी झाल्याचे वृत्त सोशल माध्यमांवर व्हायरल आहे. अशातच त्याच दिवशी पुण्यात चक्क उन पडल्याचे बोलतात. पूर्वी सारखे सात जुनला वेळेवर येणारा पाऊस आता मात्र कधीही येतो आणि जातो. पडणारा पाऊस, क्षणांत पाणीच पाणी करुन टाकतो. विकासकाम आणि भराव यामुळे नैसर्गिक पाणी वाहून जाणारे स्त्रोत, मार्ग बंद झाले. त्यामुळे थोड्याशा पडणाऱ्या पावसाने सगळीकडे पाणीच पाणी होत आहे. डोंगराळ उंच भागात असलेली शेती खुप छान बहरते, सखल भागातील शेतीचे मात्र पुराचे पाण्याने नुकसान जास्त होते. एकंदरीत पावसाळी शेती बळीराजाची चिंता वाढविणारी झाली आहे! हे मात्र सगळीकडेच बोलले जात आहे.

## मित्राची मुलगी दवाखान्यात आहे असे सांगून केली एक लाखांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मित्राची मुलगी दवाखान्यात आहे, थोडे पैसे देशील का असे सांगून एक लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार खारघर परिसरात घडला आहे. आरोपींविरोधात खारघर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर, सेक्टर ११ येथील प्रेमानंद रामनाथ किनलेकर त्यांच्या कुटुंबासह राहतात. त्यांना फेसबुक चॅटिंगद्वारे त्यांचा मित्र राजेश काळे व त्याच्या पत्नीचा डीपी फेसबुक पेजला असणाऱ्या व्यक्तीने व्हाॅट्सअप नंबर पाठवा असे सांगितले. यावेळी व्हाॅट्सअप नंबर पाठवला असता पैशांची गरज आहे, मित्राची मुलगी हॉस्पिटलला डमिट असून पैशाची गरज आहे, दोन दिवसात पैसे परत करतो असे सांगण्यात आले. त्या व्यक्तीचे व्हाॅट्सअप डीपीला सुद्धा राजेश काळे व त्याच्या पत्नीचा फोटो होता. त्यामुळे त्यांनी मुलाला दहा हजार रुपये पाठवण्यास सांगितले. त्यानंतर त्यांची मुलगी गायत्री हिने देखील पैसे पाठवून दिले. दोन्ही मुलांच्या अकाउंट मधून राजेश काळे यांना एक लाख रुपये मदतीसाठी पाठवून देण्यात आले. दुसऱ्या दिवशी प्रेमानंद यांनी राजेश काळे याना फोन करून पैसे मिळाले का अशी विचारणा केली. यावेळी राजेशने कोणतेही पैसे मागितले नाहीत, माझ्याकडे तुमचे पैसे आले नसल्याचे सांगितले.

यावेळी आपली फसवणूक झाली असल्याचे प्रेमानंद यांच्या लक्षात आले. अज्ञात इसमाने राजेश काळे यांचे नाव वापरून त्यांच्या मुलांच्या अकाउंटमधून फसवून पैसे काढले असल्याचे त्यांच्या लक्षात आले. अज्ञात इसमाविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

मा.गोडसे मॅडम

अर्जदारांतर्फे वकील
सौ.अमृता अशोक नाईक

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.६२६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०८/२१

१) श्रीमती.थंकम एम. पद्मनाभन
वय : ६९ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.दिपक एम. पद्मनाभन
वय : ४७ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.देवेश एम. पद्मनाभन
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी
अ.क्र.१ ते ३ रा.५,
आनंद मंगल को.ऑप.हौसिंग सोसायटी लिमिटेड,
पिल्लई कॉलेज जवळ, प्लॉट नं.३९,
सेक्टर ६, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
अर्जदार क्र.१ स्वतःकरिता व अर्जदार क्र.३
यांची कुलमुखत्यारी म्हणून
४) कु.दिव्या एम. व्ही. पद्मनाभन
वय : ४५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.सी-००१, नील स्प्लेन्डर को.ऑप.हौ.सोसा.लि.,
प्लॉट नं.१७, सेक्टर ६, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल, ता.पनवेल,
जिल्हा : रायगड ४१०२०६ अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, कै. पद्मनाभन मुदवडत वालप्पिल उर्फ एम. व्ही. पद्मनाभन यांची स्वकष्टार्जित जंगम मालमत्ता होती व आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे :

**जंगम मालमत्तेचे वर्णन**

**अ) मयत पद्मनाभन मुदवडत वालप्पिल उर्फ एम. व्ही. पद्मनाभन, पासबुकमधील पत्ता : ५, आनंद मंगल को.ऑप.हौसिंग सोसायटी लिमिटेड, पिल्लई कॉलेजजवळ, प्लॉट नं.३९, सेक्टर १६, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ यांचे नावे लोक भविष्य निर्वाह निधी योजना १९६८ अंतर्गत असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा कोड ४४८ येथील खाते क्र.११०३५४०६६७९ या खात्यातील रक्कम रु.१३,६१,८७०.६३ (अक्षरी रुपये तेरा लाख एकसष्ट हजार आठशे सत्तर पैसे त्रेसष्ट मात्र)**

**ब) सन २०१२ साली खरेदी केलेली चार चाकी गाडी व्हीएक्सआय-वॅगन आर-एमएच-४६-डब्ल्यू-२०६२ आज रोजीचे मुल्यांकन रक्कम रु.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र)**

कै.पद्मनाभन मुदवडत वालप्पिल उर्फ एम. व्ही. पद्मनाभन यांचे दि.२९/०१/२०१८ रोजी शेलार हॉस्पिटल ॲण्ड आयसीयू, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस सदरील अर्जदार हेच वारस असल्याचे प्रतिपादन करून तसेच सक्सेशन सर्टीफिकेट मिळणेकरिता अर्जदारांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा हरकतदाराने / नी आपली / ल्या लेखी हरकत / ती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी स्वतः अगर प्रतिनिधींमार्फत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत सदर मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीनुसार त्यांस वारस दाखला दिला जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि.१२ माहे ७ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल (कोर्टाचा शिक्का) सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

अॅड.संजय पाटकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर पनवेल यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.७४१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०८/२१

१) श्री.रघुनाथ त्रिंबक देशमुख
वय : ७६ वर्षे, व्यवसाय : शेती
२) श्री.मधुकर त्रिंबक देशमुख
वय : ७९ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.घर नं.६०२, हनुमान मंदिर जवळ,
गव्हाण पोस्ट ऑफिस गव्हाण कोपर,
गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

ज्याअर्थी वरील अर्जदार यांचे सख्खे भाऊ कै.अनंत त्रिंबक देशमुख हे दि.१६/०७/२०१२ रोजी मयत झाले असून अर्जदार हे त्यांचे सख्खे भाऊ असून कायदेशीर वारसदार आहेत.

अर्जदार भाऊ कै.अनंत त्रिंबक देशमुख यांचे नावे व सामाईक मालकीच्या खालील मिळकती होत्या. सदर मिळकतीत त्यांचा हिस्सा होता व आहे. परंतु ते मयत झाल्याने सदर मिळकतीत त्यांचा असलेला हिस्सा त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारसदार म्हणून अर्जदारांना मिळावा म्हणून सदर मिळकतीत असलेल्या हिश्श्याबाबत अर्जदारांनी वारस दाखला मिळावा यासाठी अर्ज केला आहे. सदरच्या कै.अनंत त्रिंबक देशमुख यांचे नावे असलेल्या मिळकती खालीलप्रमाणे-अ) मिळकतीचे वर्णन

| यु.के. | गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| १३ | गव्हाण | १७१ | ७+८+९+११+१२+१३+१४ अ | ०-४९-३<br>०-०२-५ |
| | | १६७ | १+३+४+५ ब १ | ३-०६-५<br>०-१३-० |

मयत कै.अनंत त्रिंबक देशमुख यांचा कै.त्रिंबक रामचंद्र देशमुख यांच्या मिळकती असलेला हिश्श्याच्या मिळकतीचे वर्णन

**ब) मिळकतीचे वर्णन**

| युनिट केस नं. | गाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| ५२३ | गव्हाण | १७१/५ | ०-०८-० |
| २६९ | गव्हाण | १४४/१+२ | ०-०२-८ |
| | | १३८/८ | ०-०५-३ |

सदर मिळकती ह्या अर्जदार यांचे भाऊ कै.अनंत त्रिंबक देशमुख यांचे नावे व मालकीच्या होत्या. सदर मिळकतीत सदर मिळकतीत त्याचा हिस्सा होता व आहे. परंतु ते दि.१६/०७/२०१२ रोजी मयत झाले असल्याने तसेच त्यांची आई कै.ताराबाई त्रिंबक देशमुख ह्या देखील मयत झालेले असल्याने त्यांचे पश्चात सदरचे मिळकतीत कै.अनंत त्रिंबक देशमुख यांचा असलेल्या हक्काबाबत अर्जदारांस वारसदाखला मिळावा म्हणून अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी कै.अनंत त्रिंबक देशमुख यांचे नावे असलेल्या वर नमूद केलेल्या मिळकतीत त्यांचा असलेला हिस्सा व हक्कास अर्जदार हे कै.अनंत त्रिंबक देशमुख यांचे कायदेशीर वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनुसार अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार घेतली जाणार नाही.

आज दि.१३/०७/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्याने दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल (कोर्टाचा शिक्का) सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल